**साक्षीदार क्र. १**
ची साक्ष शपथेवर सुरु

सं.फौ.प्र. ५२४/२०१७
सरकार ..वि.. प्रमिला +१
**नि.क्र. १६**

**नाव –संजय आनंदराव पडोळे,**
वय – ५० वर्षे, धंदा –शेती,
रा. खरपी, ता. अचलपुर, जि. अमरावती

**सरतपासणी करीता सरकारतर्फे सहा. सरकारी वकिल कु. आर. एस. श्रीराव मार्फत**

१. मी दोन्ही आरोपींना ओळखतो. ते माझ्या घराशेजारी राहतात. घटना ही २ ते ३ वर्षापुर्वी माझ्या घरी सकाळी १०.०० वा. दरम्यान घडली होती. त्यावेळी माझ्या घराच्या पायाचे काम सुरु होते. त्यावेळी दोन्ही आरोपी माझ्या घराकडे आले, बांधकाम रोखले व शिवीगाळी करु लागले. त्यावेळी आरोपी– दिपक हा दारु पिवुन होता. त्याने मला 'काम बंद करो नहीतो काट डालेंगे' असे म्हणाला. त्यानंतर मी शिरजगाव कसबा पो. स्टे. येथे रिपोर्ट देण्याकरीता गेलो. आता मला अभिलेखावरील **रिपोर्ट** व **छापील प्रथम खबर** दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे **नि.क्र.१७ व नि.क्र.१८** देण्यात येते. पोलीस चौकशी करीता आले होते परंतु पोलीसांनी कोणतिही कार्यवाही केली नव्हती. पोलीसांनी माझे बयान सुध्दा घेतले नव्हते.

**आरोपींतर्फे उलटतपास : श्री. पाटील वकील यांच्यामार्फत**

२. हे म्हणणे खरे आहे की, माझे घर सार्वजनिक ठिकाणाजवळ नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे दिपक माझ्या घरी आला नाही व त्याने कुठलिही शिवीगाळी मला केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी दोन्ही आरोपींविरुध्द खोटा रिपोर्ट दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास काही नाही.**

सा.वा.दा.ब.अ.क.केले.

समक्ष

**(श्रीमती डी.के. साहू)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्या.क्र.३, चांदूर बाजार

**(श्रीमती डी.के. साहू)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्या.क्र.३, चांदूर बाजार

**दिनांक – ०८.०९.२०२३**